महा मेट्रो

PUNE METRO

# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड

# (पुणे मेट्रो रेल प्रकल्प )

---

## पुणे मेट्रोचे खडकी मेट्रो स्थानक शुक्रवार, २१ जून २०२५ रोजी पासून प्रवासी सेवेत दाखल.




पुणे, 20 जून, २०२५: पुणे मेट्रोच्या प्रवाशांसाठी एक आनंदाची बातमी! पुणे मेट्रोचे खडकी मेट्रो स्थानक शुक्रवार, २१ जून २०२५ रोजी सकाळी ७ वाजल्यापासून प्रवासी सेवेत दाखल होत आहे. महाराष्ट्र राज्याचे माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या स्थानकाचे लोकार्पण होणार आहे.

खडकी मेट्रो स्थानक हे पुणे मेट्रोच्या पहिल्या टप्प्यातील पिंपरी चिंचवड मनपा ते स्वारगेट या महत्त्वपूर्ण मार्गिकेवर स्थित आहे. हे स्थानक खडकी रेल्वे स्थानकाच्या अगदी जवळ असल्यामुळे, मेट्रो आणि रेल्वे या दोन्ही वाहतूक सेवांचे या ठिकाणी एकत्रीकरण शक्य झाले आहे. यामुळे प्रवाशांना सार्वजनिक वाहतुकीचा वापर करताना अधिक सोयीस्कर आणि अखंड प्रवासाचा अनुभव घेता येईल.

या नवीन स्थानकामुळे खडकी परिसरातील नागरिकांना तसेच रेल्वेने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना पुणे मेट्रोच्या सेवेचा लाभ घेणे सुलभ होईल. पुणे मेट्रोच्या विस्तारात खडकी स्थानकाची भर पडल्याने सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक बळकट झाली आहे, ज्यामुळे शहरातील वाहतूक कोंडी कमी होण्यास आणि प्रदूषण नियंत्रणात मदत होईल.